# माहिती अवलोकन दिनाबाबत शासकीय कार्यालये अनभिज्ञ

पारदर्शी कारभार; पुणे पॅटर्न सरकारने स्वीकारला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : शासनाच्या विविध खात्यातील कामकाजात पारदर्शकता येण्यासाठी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये दर सोमवारी माहिती अवलोकनासाठी ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. मात्र या कायद्याबाबत शासकीय कार्यालयात अनभिज्ञता आहे.

माहिती अधिकार कार्यकर्त्यांना कोणतीही माहितीच उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे.

या कायद्यामुळे नागरिकांना कोणत्याही विषयाबाबतचे दफ्तर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. शासकीय कामकाजाची माहिती नागरिकांना मिळावी यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने माहिती अधिकार कायदा केला असला तरी प्रत्यक्षात त्यासाठी अर्ज करणे, उत्तराची प्रतिक्षा करणे यात वेळ जातो. अपेक्षित माहिती मिळाली नाही तर त्यावर अपिलीय अधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आणि अपिलांमध्ये वेळ जातो. त्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने २००९ पासूनच वेगळा उपक्रम राबविला आहे. त्यानुसार आठवड्यातून एक दिवस माहिती आणि सर्व अभिलेख उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे विशिष्ट दिवशी नागरिक कोणत्याही प्रकारची माहिती पुणे महापालिकेच्या संबंधित विभागात जाऊन बघू शकतात. याच धर्तीवर शासनाने निर्णय घेतला आहे.

## काय आहे शासनाचे आदेश?

माहिती अधिकाराच्या अर्जांची तसेच त्यानंतर येणाऱ्या अपिलीय अर्जांची संख्या कमी करण्यासाठी आता महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदेसह सर्वच शासकीय कार्यालयात दर सोमवारी दुपारी तीन ते पाच या वेळात माहिती अधिकारानुसार लेखे किंवा अन्य माहिती अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याचे आदेश सामान्य प्रशासनाने दिले आहेत.

“ राज्य शासनाच्या आदेशाबाबत शासकीय कार्यालयांत अनभिज्ञता आहे. गेल्या सोमवारी आदिवासी आयुक्तालय, महापालिका आणि अन्य काही कार्यालयात माहितीचे अभिलेख बघण्यासाठी संस्थेचे कार्यकर्ते गेले होते, मात्र अशा प्रकारचे आदेशच संबंधितांपर्यंत पोहोचलेले नाहीत, असे दिसते.

\- **संतोष जाधव**, अध्यक्ष, लोकनिर्णय संस्था



महाराष्ट्र लोकसेवा आयोग : ग्रंथालय दैनिक वर्तमानपत्र कात्रण सेवा